माहिती व जनसंपर्क महासंचालनालय व अधिनस्त कार्यालयातील वाहनचालक गट-क संवर्गातील १० पदांच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्याच्या प्रस्तावास मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क विभाग
शासन निर्णय क्र.मावज २०२२/१९४/प्र.क्र.०५/मावज-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- ६ ऑगस्ट, २०२६.

संदर्भ :-१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र: मावज २०२०/१२२/ प्र.क्र. ३२/का-३४ अ, दिनांक २ मार्च, २०२१.

२) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. -पदनि-२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क,दि. २७.०४.२०२२.

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. मावज २०२२/२५४/प्र.क्र. ६९ (भाग-२)/ का ३४-अ, दि.३१ मे, २०२२.

४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. मावज २०२२/१९४/ प्र.क्र. ६९ /का ३४-अ, दि. २१ जून, २०२२.

५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. मावज २०१६/ प्र.क्र. ८२ / भाग-३/का ३४-अ, दि. १८ जुलै, २०२२.

६) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. मावज २०२२/१९४/ प्र.क्र. ६९ /का ३४-अ, दि. ८ फेब्रुवारी, २०२३.

७) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. मावज २०२२/१९४/ प्र.क्र. ६९ /का ३४-अ, दि. २६ जून, २०२३.

८) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. मावज २०२२/१९४/ प्र.क्र. ६९ /का ३४-अ, दि. ११ जून, २०२४.

९) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. मावज २०२५/४/ प्र.क्र. ०५/का ३४-अ, दि. १६ मे, २०२५.

१०) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. मावज २०२५/४/ प्र.क्र. ०५/का ३४-अ, दि. १० नोव्हेबर, २०२५.

११) संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र. वाहन-(२०२६)/बाह्ययंत्रणाद्वारे वाहनचालक/का-१/१६०८, दिनांक २३.०७.२०२६.

प्रस्तावना :-

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडील प्रसिध्दीच्या कामकाजाचे तातडीचे स्वरुप पाहता, तसेच वाहनांची असलेली निकड, मा. मुख्यमंत्र्यांच्या प्रत्येक कार्यक्रमांच्या प्रसिध्दी पथकास (Convoy) वाहनांची असणारी आवश्यकता व मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री, मा. राज्यमंत्री यांची प्रसिध्दीची कामे लवकरात लवकर पूर्ण करणे या बाबी विचारात घेता माहिती व जनसंपर्क महासंचालनालय व अधिनस्त कार्यालयातील वाहनचालकांची १० रिक्त पदे उक्त संदर्भ क्र. १० येथील दिनांक १० नोव्हेबर, २०२५ च्या शासन निर्णयान्वये उपसमितीने दिलेल्या मान्यतेनुसार वाहनचालक गट-क या संवर्गातील सरळसेवेची १० रिक्त पदे बाह्ययंत्रणेमार्फत घ्यावयाच्या १० मनुष्यबळ सेवांना ११

महिन्यांची मुदतवाढ (दि. ०७.०८.२०२६ पासून दिनांक ०६.०७.२०२७ पर्यत) देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील वाहनचालक, गट-क या संवर्गातील १० पदांच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्याच्या प्रस्तावास वित्त विभागाद्वारे गठीत उपसमितीने दिनांक ०८/०४/२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्णयानुसार भविष्यात संबंधितांकडून नियमित सेवेत घेण्याच्या अनुषंगाने न्यायालयीन प्रकरणे उद्भवणार नाहीत ही बाब विचारात घेऊन विभागाचा प्रस्ताव दर ११ महिन्यांच्या कालावधीनंतर नव्याने निविदा घेण्याच्या अटीच्या अधीन राहून १० मनुष्यबळ सेवा बाह्ययंत्रणेद्वारे उपसमितीने दिलेल्या मान्यतेनुसार माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुख्यालय, मुंबई येथील वाहनचालक गट-क या संवर्गातील १० मनुष्यबळ सेवा बाह्ययंत्रणेमार्फत घेण्यासाठी दिनांक ०७.०८.२०२६ पासून दिनांक ०६.०७.२०२७ पर्यत ११ महिन्याची मुदतवाढ देण्यात येत आहे.

०२. सदर मनुष्यबळ भरताना वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २७/०४/२०२२ मध्ये नमूद केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे. तसेच, बाह्ययंत्रणेव्दारे कामे करुन घेण्यासाठी शासनाने विहित केलेल्या नियम व कार्यपध्दती यांचे पालन करून त्यानुसार नव्याने बाह्ययंत्रणेची निवड करुन १० मनुष्यबळाची सेवा घेण्यात यावी.

०३. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३५/आपुक, दिनांक २७.०१.२०२५ अन्वये दिलेल्या मंजूरीच्या अधीन राहून तसेच अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व सचिव (व्यय), वित्त विभाग यांच्या उपसमितीने दिनांक ०८.०४.२०२४ च्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०४. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०८०६१५३५५१७०३८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR

Digitally signed by YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=F7CCDB18D954BB814D3CC3C92AB0C128E19F5F95C724ABAF0A38FA1A74DEC734, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A45294B68B97E03C570AFA8F17C64F6DFE2A4A241DD2AFF2322FEEC22B389F5, cn=YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
Date: 2026.08.06 15:37:39 +05'30'

(युवराज सोरेगांवकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव (मा. व ज.) माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०००३२,
२. महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई-४०००२०,
३. संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०००३२,
४. उपसंचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय, मुंबई-४०००३२,
५. उप संचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०००३२,
६. अवर सचिव (कार्यासन आ.पु.क), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२,
७. निवड नस्ती.